**<u>ठळक बातम्या</u>**

- गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं यासाठीच्या देशव्यापी मोफत लसीकरण मोहिमेला सुरुवात

- राज्यात हमीभावानं कापूस खरेदीला १५ मार्च पर्यंत मुदतवाढ / हरभरा खरेदी उद्यापासून

- एसटीमधल्या सवलतींसाठी NCMC कार्ड सध्या अत्यावश्यक नसल्याचं परिवहन मंत्र्यांचं स्पष्टीकरण

- अजित पवार यांचं विमान झाडांना आदळल्यानंतर बारामतीच्या धावपट्टीवर कोसळल्याचा प्राथमिक अहवाल

**आणि**

- अमेरिका आणि इस्राइलनं इराणवर केलेल्या हल्ल्यात ४१ नागरिकांचा मृत्यू

**<><><><><>**

एचपीव्ही लसीकरणाच्या देशव्यापी मोहिमेचा प्रारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज राजस्थानात अजमेर इथं झाला. गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं याकरता १४ वर्ष वयाच्या मुलींना ही लस देण्यात येणार आहे. दरवर्षी १ कोटी १५ लाख मुलींना लस देण्याचं मोहिमेचं उद्दिष्ट आहे. सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस मोफत दिली जाणार असून हे लसीकरण ऐच्छिक आहे. यावेळी प्रधानमंत्री म्हणाले

**होल्ड- बाईट प्रधानमंत्री**

**<><><><><>**

राज्यात कापूस खरेदीची मुदत १५ मार्च पर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती सरकारने आज विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. मुदत वाढवण्याचा प्रस्ताव पणन

विभागाने केंद्र सरकारकडे पाठवला होता, त्यानुसार केंद्र सरकारने याला परवानगी दिली आहे. प्रति एकर उत्पादकतेच्या आधारे खरेदीची मर्यादा ठरवली जाणार आहे. यासह हरभरा खरेदी ५ हजार ८८५ रुपये प्रति क्विंटल हमीभावाने उद्यापासून सुरू करण्यात येईल.

**<><><><><>**

गिग कामगारांसाठी राज्य सरकारला स्वतंत्र महामंडळ स्थापन करता येणार नाही, मात्र केंद्र सरकार राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा महामंडळ स्थापन करणार आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याच्या माध्यमातून जीवन आणि अपंगत्व विमा, आरोग्य आणि मातृत्व लाभ, वृद्धापकाळ संरक्षण, शिक्षण आदी लाभ देण्यात येतील, असं फुंडकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

२०२५ या वर्षात राज्यात राहणाऱ्या २ हजार ३७६ अवैध बांगलादेशी घुसखोरांना हद्दपार केल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज विधानपरिषदेत दिली. प्रवीण दरेकर यांनी याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती. २०२१मध्ये १०९, २०२२मध्ये ७७, २०२३मध्ये १२७, तर २०२४मध्ये २०२ जणांना हद्दपार केल्याचंही त्यांनी सांगितलं. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात इंटेलिजन्स आधारित संयुक्त मोहीम राबवण्यात येत असून प्रत्येक पोलीस ठाण्यात ५ कर्मचाऱ्यांचं विशेष पथक नेमण्यात आलं आहे. राज्यात पहिल्यांदाच डिटेन्शन सेंटर उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असंही कदम यांनी सांगितलं.

**<><><><><>**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने देशातली पहिली एआय-आधारित वाहतूक प्रणाली

बसवण्याचं काम प्रगतीपथावर आहे. या प्रणालीमुळे वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन भविष्यात अपघातांचं प्रमाण कमी व्हायला मदत होईल, अशी माहिती राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधान परिषदेत दिली.

मुंबई–गोवा महामार्गावर प्रलंबित कामांना गती दिली असून माणगाव आणि इंदापूर बायपासची कामं युद्धपातळीवर सुरू आहेत. हा बायपास वगळता उर्वरित मुंबई–गोवा महामार्ग मे महिन्यापर्यंत पूर्णत्वाला जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी विधान परिषदेत दिली.

एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन मुंबईचा वाहतूक व्यवस्थापन एआय आराखडा तयार करण्यात येत असल्याची माहिती तंत्रज्ञान आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी दिली. विधानसभेत आज औचित्याच्या मुद्यावर मांडलेल्या वाहतुक कोंडीच्या मुद्द्यावर ते उत्तर देत होते.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राज्यभर राबवलं जाणार आहे. या अंतर्गत ७ आणि १४ मार्चला तालुक्यातल्या दोन मंडळात आणि बाकीच्या दोन मंडळात १० एप्रिल आणि १७ एप्रिलला शिबिरं होणार आहेत. तसंच ८ आणि १५ मे ला नगरपरिषद स्तरावर शिबिरं होतील अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

**होल्ड - बावनकुळे बाइट**

**<><><><><>**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान झाडांना आदळून त्यानंतर बारामतीच्या धावपट्टीवर अपघातग्रस्त झाल्याचं हवाई अपघात तपास संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे. हा अहवाल आज प्रसिद्ध झालं. अपघातानंतर विमानानं पेट घेतला आणि त्यात संपूर्ण कॉकपिट आणि केबिन जळून खाक झालं. विमानातले दोन्ही रेकॉर्डर्सही आगीच्या तडाख्यात सापडले, त्यामुळे त्यांच्यातला

डेटा मिळवण्यासाठी विशेष तंत्र वापरावं लागलं, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे. यापैकी एसएसएफडीआर या रेकॉर्डरमधला रॉ डेटा डाऊनलोड करण्यात यश आल्याचं अहवालात सांगितलं आहे.

**<><><><><>**

एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवासासाठी सध्या NCMC स्मार्ट कार्डची सक्ती केली जाणार नाही असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे. जोपर्यंत ८० टक्के सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत कार्ड अनिवार्य केलं जाणार नाही, असं एसटी महामंडळानं स्पष्ट केलं आहे. आतापर्यंत सुमारे १ लाख नागरिकांनी हे कार्ड घेतलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्रायलनं आज संयुक्तपणे इराणवर लष्करी हल्ला केला. याची झळ इतर आखाती देशांनाही बसली आहे. या हल्ल्यामुळं इराणमध्ये ४० शालेय विद्यार्थिनी आणि अबुधाबीत एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाइस कास्ट

*अमेरिका आणि इस्राइलनं इराणमधल्या मिनाब शहरातल्या मुलींच्या शाळेवर केलेल्या हल्ल्यात ४० शालेय विद्यार्थिनींचा मृत्यू झाला तर इतर ४४ जखमी झाल्याचं दक्षिण इराणमधल्या आयआरएनए या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. याच शहरात इराणच्या निमलष्करी दलाचा तळ आहे. तेहरानवर अनेक क्षेपणास्त्रांनी हल्ला चढवण्यात आला. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या कार्यालयाजवळही हल्ले झाले. इराणमधे फोन सेवा विस्कळीत झाली आहे. या हल्ल्यानंतर काही तासांनी इराणनं इस्त्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र डागत प्रतिहल्ला चढवला. इराणच्या हल्ल्यात संयुक्त अरब अमरातीची राजधानी अबुधाबीत एकाचा मृत्यू झाला. अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेला सध्याच्या इराणमधल्या सत्तेपासून धोका असल्यामुळे अमेरिकेच्या लष्करानं ही मोठी मोहीम सुरू केली आहे, असं समाज माध्यमांवरच्या आठ मिनिटांच्या व्हिडिओत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यांनी सांगितलं. जेव्हा युद्ध संपेल, तेव्हा तुमचं सरकार तुम्ही सांभाळा. ही तुमच्या अनेक पिढ्यांना मिळणारी कदाचित एकमेव संधी असेल, असं ट्रम्प इराणच्या नागरिकांना उद्देशून म्हणाले.*

*इस्त्रायलमध्ये आणिबाणी लागू केल्याचं इस्त्रायलचे संरक्षण मंत्री इसराईल कात्झ यांनी सांगितलं. या हल्ल्यानंतर एअर इंडिया, इंडिगोसह जगभरातल्या अनेक विमान कंपन्यांनी आखाती देशातली हवाई सेवा रद्द केली आहे. पाकिस्तानसह अनेक देशांनी अमेरिका आणि इस्राइलच्या या हल्ल्याचा निषेध केला आहे.*

<><><><><>

मुंबईत चेंबूर इथल्या सुभाष नगर परिसरात बांधकामाधीन असलेल्या इमारतीवरून सहा मजूर कोसळले. यात एकाचा मृत्यू झाला तर अन्य पाच जखमी झाले. ही घटना आज दुपारी घडली.

<><><><><>

रेल्वे तिकिट सेवा देणारं यूटीएस ॲप उद्यापासून बंद करण्यात आल्याची घोषणा रेल्वे मंत्रालयानं केली. तिकीट सेवा रेल वन ॲपवर सुरू राहणार आहे. तसंच यूटीएसमधल्या आर - वॉलेटची शेष रक्कम आपोआप रेल वन ॲपच्या वॉलेटमध्ये जमा होईल. प्रवाशांनी ज्या मोबाइलवरून यूटीएसवर नोंदणी केली होती, त्याच मोबाइलवरून रेल वन ॲपवर नोंदणी करण्याचं आवाहन रेल्वेनं केलं आहे.

<><><><><>

खारघर इथल्या ओवे मैदानात हिंद - दी - चादर हा शहिदी समागम कार्यक्रम सुरू आहे. आज सकाळच्या सत्रात दीड लाख भाविकांनी दर्शन घेतलं. शिख पंथाचे नववे गुरू तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त राज्याचा अल्पसंख्याक विकास विभाग आणि शहिदी समागम राज्य समन्वय समितीच्या संयुक्त विद्यमानं हा कार्यक्रम होत आहे.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर व्यवस्था सुरू असून सर्व धर्मीय भाविकांना भोजन दिले जात आहे.  आज पहिल्या दिवशी अंदाजे दोन लाखांहून अधिक भाविकांनी लंगर सेवेचा लाभ घेतल्याची माहिती आयोजकांनी

दिली. या कार्यक्रमासाठी तीन मोठ्या मंडपांमध्ये दोन लाख भाविक बसू शकतील अशी व्यवस्था केली आहे. या परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने दोन हजार पोलीस कर्मचारी तैनात आहेत, अशी माहिती कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

<><><><><>

नाशिकमध्ये सुरू असलेल्या चौथ्या विश्व मराठी संमेलनात आज विविध विषयांवरील परिसंवाद झाले. कृत्रिम बुध्दीमतेमुळे मराठीला बळ मिळेल तसेच माध्यमे ही भाषा सशक्त करीत असल्याचे मत विविध परीसंवादांमध्ये व्यक्त करण्यात आले.

//<><><><><>//